# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०३** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि. ११/१०/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ११/१०/२०१८ गुरुवार रोजी सकाळी ११.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे सुरेखा सुदाम |
| जोहरे प्रिया मधुकर | काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत |
| नेरकर सरिता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडू |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन जयश्री सुनिल |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुडलिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | काळे रेश्मा कुंदन |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरीफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | पाटील कुलभुषण विरभान | सोनार रंजना विजय |
| सोनवणे भारती कैलास | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| चौधरी चेतना किशोर | कोल्हे सिंधु विजय | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णु रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे राखी शामकांत | राणे गायत्री इंद्रजित | शेख सैईदा युसुफ |
| तायडे ज्योती शरद | तायडे सुरेखा नितीन | पटेल इब्राहिम मुसा |
| लढढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त, श्री. चंद्रकांत खोसे, मा.उपायुक्त, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य, सनकत चेतन गणेश,चोधरी मनोज सुरेश, पाटील उषा संतोष, बरडे नितीन मनोहर यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दांजलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.सिमाताई सुरेश भोळे, महापौर | दि.२९/०७/२०१८ रोजी मनपाचे जेष्ठ नगरसेवक स्व.नरेंद्रराव भास्करराव पाटील, स्व.दिपक देविदास कदम रा.शिवाजी नगर, जिल्हा बँक व दुध संघाच्या माजी चेअरमन आणि मविप्र संस्थेचे सभासद स्व.सुमनबाई चुडामण पाटील, स्व.प्रकाश पोतदार रा.महेश प्रगती मागे वृंदावन अर्पा., स्व.सुभाष कमलाकर पाटील रा.हरेश्वर नगर, स्व.प्रल्हाद रामदास पाटील रा.नंदनवन कॉलनी, स्व.लीना भंगाळे रा.शिव कॉलनी, स्व.संजय जाधव रा.भास्कर मार्केट परिसर, मनपा कर्मचारी श्री.संजय कृपाराम बाविस्कर यांचे मातोश्री, म.न.पा.कर्मचारी श्री.दिलीप जानकीराम पाटील यांच्या पत्नी स्व.संध्या दिलीप पाटील तसेच पुतणे स्व.राजेंद्र प्रकाश पाटील, माजी खासदार श्री.गुणवंतराव सरोदे यांच्या पत्नी स्व.शामलाताई गुणवंतराव सरोदे, स्व.भागवत पंढरीनाथ बोरोले, रा.शिव कॉलनी परिसर या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |

| | | |
|---|---|---|
| २. | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | देशाचे माजी पंतप्रधान तथा भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते स्व.अटलबिहारी वाजपेयी, मनपाचे जेष्ठ नगरसेवक मा.कै. नरेंद्र भास्करराव पाटील, भोर लेवा पंचायतीच्या उपाध्यक्षा जळगांव जनता सहकारी बँकेच्या संचालिका स्व.शामलाताई गुणवंतराव सरोदे, म.न.पा. कर्मचारी श्री.दिलीप जानकीराम पाटील यांच्या पत्नी कै.संध्या दिलीप पाटील या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ३. | श्री.ललित विजयराव कोल्हे | माजी खासदार श्री.डॉ.गुणवंतराव सरोदे यांच्या पत्नी स्व.शामलाताई गुणवंतराव सरोदे, कै. वनिता नारायण लाठी अड.नारायण लाठी यांच्या पत्नी, कै.गोवर्धनदास भामरे रा.विवेकानंद नगर, म.न.पा.कर्मचारी श्री.दिलीप जानकीराम पाटील यांच्या पत्नी स्व.संध्या दिलीप पाटील या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ४. | सौ.गायत्री उत्तम शिंदे | मनपाचे जेष्ठ नगरसेवक मा.कै.अणासाहेब नरेंद्र भास्करराव पाटील यांचे दि.२९/०७/२०१८ रोजी दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ५. | श्री.प्रशांत सुरेश नाईक | मेहरुण परिसरातील सामाजिक कार्यकर्ते स्व.संजय देविदास पाटील, स्व.दत्तु बबन वंजारी रा.जय जवान चौक यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ६. | सौ.चेतना किशोर चौधरी | मनपाचे जेष्ठ नगरसेवक मा.कै. नरेंद्रराव भास्करराव पाटील, स्व.दिलीप देविदास कदम रा.शिवाजी नगर यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ७. | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | भारताचे लाडके माजी पंतप्रधान आदरणीय अटल बिहारी वाजपेयी यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ८. | श्रीमती लताताई रणजित भोईटे | सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा सुधिर पाटील प्र.क्र.८ यांचे सासरे कै.प्रल्हाद भिका पाटील यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ९. | सौ.भारती कैलास सोनवणे | सौ.श्यामलाताई सरोदे यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १०. | श्री.विष्णु रामदास भंगाळे | माजी नगरसेवक अजय राम जाधव यांचे बंधु कै.संजय राम जाधव, चैत्राम लीलाधर भंगाळे यांची पत्नी कै.लिना चैत्राम भंगाळे, माजी खासदार श्री.गुणवंतराव सरोदे यांची पत्नी कै. शामलाताई गुणवंतराव सरोदे, नगरसेविका सौ.प्रतिभा सुधिर पाटील यांचे सासरे कै.प्रल्हाद भिका पाटील या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ११. | सौ.मंगला संजय चौधरी | स्व.अटलबिहारी वाजपेयी मा.प्रधानमंत्री यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १२. | सौ.उज्वला मोहन (किरण) बेंडाळे | स्व.अटलबिहारी वाजपेयी मा.प्रधानमंत्री व कै.श्यामला गुणवंतराव सरोदे यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १३. | सौ.शोभाताई दिनकर बारी | भाजपाचे नगरसेवक श्री.विजय पुंडलिक पाटील यांचे चिरंजीव स्व.यशपाळ विजयसिंग पाटील यांचे दिर्घ आजाराने दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १४. | अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | स्व.संजय राम जाधव, सामाजिक कार्यकर्ते, स्व.सुमनताई पाटील, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका रा.ढाके कॉलनी या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १५. | सौ.रेश्मा कुंदन काळे | स्व.शोभा तोताराम चौधरी, स्व.प्रतिभा पुरुषोत्तम नेहेते, स्व.वासुदेव हरी वाणी, स्व.सरस्वती रामकृष्ण पातोंडेकर या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १६. | श्री.किशोर रमेश बाविस्कर | गं.भा.सावित्रीबाई अर्जुन सपकाळे व मनपा कर्मचारी श्री.वसंत सुपडू सपकाळे यांचे लहान भाऊ स्व.वाल्मिक सुपडू सपकाळे या सर्वांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| १७. | श्री.इब्राहीम मुसा पटेल | स्व.अटलबिहारी वाजपेयी मा.प्रधानमंत्री व कै.श्यामला गुणवंतराव सरोदे यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दुःखद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दुःख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दुःखात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०४ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमाताई सुरेश भोळे, महापौर | संपुर्ण भारत स्वच्छतेबाबत जनजागृती करीता सन्मा.नगरसेविका सौ.भारती कैलास सोनवणे यांनी त्यांच्या प्रभागात स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत ३० लाखाचे पारितोषिक मिळविलेबाबत, जळगांव म.न.पा. सार्वत्रिक निवडणुक २०१८ मध्ये समस्त सन्मा.नगरसेवक / नगरसेविका हे मतदान प्रक्रियेतुन निवडुन आल्याबद्दल त्या सर्वांचे अभिनंदन. |
| २ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | जळगांव शहराच्या महापौर म्हणुन सौ.सिमा सुरेश भोळे यांची निवड झाल्याबद्दल तसेच सर्व नवनिर्वाचित मनपा सदस्य निवडुन आल्याबद्दल यांचे सर्वांचे हर्दिक अभिनंदन. |
| ३ | श्री.ललित विजयराव कोल्हे | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस,मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांचे हस्ते उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाचे नामांतर कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ नामांतर करणेबाबत व जळगांव म.न.पा. सार्वत्रिक निवडणुक २०१८ मध्ये समस्त सन्मा.नगरसेवक / नगरसेविका हे मतदान प्रक्रियेतुन निवडुन आल्याबद्दल, मा.ना.गिरीषभाऊ महाजन यांनी स्वत: वैयक्तीक १०० व्यक्ती सोबत घेऊन केरळ राज्यातील पुरग्रस्तांना वैद्यकीय मदत व इतर मदत पुरविल्याबद्दल व मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणविस साहेबांनी म.न.पा.ला दिलेला १०० कोटींचा निधी हा संपुर्ण राज्य शासन देईल असे जाहिर केलेस त्यांचे व बाकी सर्वांचे अभिनंदन. |
| ४ | सौ.चेतना किशोर चौधरी | संपुर्ण भारत स्वच्छतेबाबत जनजागृती करीता सन्मा.नगरसेविका सौ.भारती कैलास सोनवणे यांनी त्यांच्या प्रभागात स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत ३० लाखाचे पारितोषिक मिळविलेबाबत अभिनंदन. |
| ५ | सौ.प्रतिभा गजानन देशमुख | २३ ऑक्टोबर २०१८ ते २७ ऑक्टोबर २०१८ नानजिंग चीन येथे दुसऱ्या आशियाई युनिर्वसिटी सॉफ्टबॉल स्पर्धेत नुतन मराठा विद्यालयाची विद्यार्थीनी कु.शिवाणी राजेंद्र देशमुख ची भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाल्याबद्दल अभिनंदन. |
| ६ | सौ.दिपमाला मनोज (पिंटु) काळे | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव असे नामकरण केल्याबद्दल व जळगांव शहरासाठी मुलभुत नागरी सुविधा कामी २०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याबद्दल मा.मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस सो., मा.ना.श्री. गिरिषजी महाजन(जलसंपदामंत्री म.स.) मा.ना.चंद्रकांतदादा पाटील (महसुलमंत्री म.स.) मा.मंत्री आमदार श्री.एकनाथजी खडसे, आमदार राजुमामा भोळे, आमदार चंदुभाई पटेल यांचे सर्वांचे अभिनंदन. |
| ७ | सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण | भारतीय जनता पक्षाच्या जळगांव शहरात मोठया प्रमाणात सत्ता आली असुन त्यात ५७ नगरसेवक -नगरसेविका निवडुन आल्या बद्दल त्यांचे क्षेय मा.ना.गिरीषभाऊ महाजन, मा.श्री.राजुमामा भोळे, मा.चंदुभाई पटेल, मा.स्मिताताई वाघ व खासदार मा.श्री.ए.टी.नाना पाटील यांचे अभिनंदन तसेच मा.सौ.सिमाताई भोळे महापौर झाल्याबद्दल, मा.श्री.डॉ.अश्विनभाऊ सोनवणे उपमहापौर झाल्याबद्दल आणि मा.श्री.भगतभाऊ बालाणी यांची गटनेता म्हणुन निवड झाल्याबद्दल यांचे सर्वांचे हार्दिक अभिनंदन. |
| ८ | अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांचे नेतृत्वात भारतीय जनता पार्टीने जळगांव महापालिकेत मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल, मा.मुख्यमंत्री यांनी निवडणुक पुर्व काळात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे जळगांव महानगरपालिकेस विकास कामासाठी १०० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल, स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत राबवल्या गेलेल्या स्वच्छ प्रभाग सर्व्हेक्षण स्पर्धेत प्रभाग क्र.२१ ला प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल तेथील तत्कालीन व विद्यमान नगरसेविका सौ.भारतीताई कैलास सोनवणे व तत्कालीन नगरसेवक श्री.रमेशदादा जैन यांचे तसेच याच स्पर्धेत तेथिल तत्कालीन व विद्यमान नगरसेविका सौ.दिपमाला मनोज काळे व सौ.सिमा सुरेश भोळे यांचे सर्वांचे अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ९ | सौ.रेश्मा कुंदन काळे | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला खान्देशकन्या थोर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे नांव दिल्याबद्दल अभिनंदन. |
| १० | श्री.अमित पांडुरंग (बंडुदादा) काळे | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला खान्देशकन्या थोर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे नांव दिल्याबद्दल तसेच जळगांव शहरासाठी मुलभुत नागरी सुविधा कामी २०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याबद्दल मा.मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस सो., मा.ना.श्री. गिरिषजी महाजन (जलसंपदामंत्री म.स.) मा.ना.चंद्रकांतदादा पाटील (महसुलमंत्री म.स.) मा.मंत्री आमदार श्री.एकनाथजी खडसे, आमदार राजुमामा भोळे, आमदार चंदुभाई पटेल यांचे सर्वांचे अभिनंदन. |
| ११ | उज्वला मोहन (किरण) बेंडाळे | मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांचे नेतृत्वात भारतीय जनता पार्टीने जळगांव महापालिकेत मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल, मा.मुख्यमंत्री यांनी निवडणुक पुर्व काळात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे जळगांव महानगरपालिकेस विकास कामासाठी १०० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला खान्देशकन्या थोर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे नांव दिल्याबद्दल मा.मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस सो., मा.ना.श्री. गिरिषजी महाजन (जलसंपदामंत्री म.स.) मा.ना.चंद्रकांतदादा पाटील (महसुलमंत्री म.स.) मा.मंत्री आमदार श्री.एकनाथजी खडसे, आमदार राजुमामा भोळे, आमदार चंदुभाई पटेल यांचे सर्वांचे अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं.१)** दि.०५/०५/२०१८ रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.शुचिता हाडा** :- दि.०५/०५/२०१८ रोजी झालेल्या महासभेत आयत्या वेळेस घेण्यात आलेल्या पिंप्राळा शिक्षण संस्था यांना मनप प्राथमिक शाळा क्र.४८ व ५२ कायम स्वरुपी चालविणेस देणेच्या विषयी चर्चा झालेली नसल्यामुळे सदर विषय तहकुब ठेवुन उर्वरीत कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, दि.०५/०५/२०१८ रोजी झालेल्या महासभेत आयत्या वेळेस घेण्यात आलेल्या पिंप्राळा शिक्षण संस्था पिंप्राळा ता.जि.जळगांव येथील शाळा क्र.४८आणि ५२ या प्राथमिकशाळा (निमखेडी सोमाणी मार्केट परिसर) आमच्या संस्थेला कायम स्वरुपी चालविणेसाठी मिळणेबाबत सचिव, संजय भगिरथ सोमाणी यांनी दिलेल्या अर्जावर /प्रस्तावावर निर्णय घेणे. या विषयी चर्चा झालेली नसल्यामुळे सदर विषय तहकुब ठेवुन उर्वरीत कार्यवृत कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं.२)** मक्तेदार श्री.कमर्शियल, जळगांव यांचे रक्कम रु.१०,०००/- कालबाह्य निविदा अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.शुचिता हाडा** :- मक्तेदार श्री कमर्शियल यांची निविदा अनामत बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, म.न.पा.भांडार विभाग म.न.पा.छत्रपती शाहु महाराज दवाखाना व इतर दवाखाने करीता वैदयकीय साहित्य उपकरणे व फर्निचर खरेदी करणे कामी जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार मक्तेदार श्री.कमर्शियल,जळगांव यांनी पावती क्रं.२४००० दिनांक १४/१२/२०१० अन्वये रक्कम रु.१०,०००/- मात्र निविदा अनामत रक्कम भरलेली होती. सदरचे काम मनपा निधी अंतर्गत पूर्ण करण्यात आलेले आहे. काम पूर्ण झाल्याने मक्तेदाराने निविदा अनामत रक्कमेची मागणी केलेली आहे.

परंतु सदरची निविदा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम ४५ नुसार मुदत सिमांकन संबंधीत कायदयातील तरतुदी नुसार मुदतबाहय झालेल्या मागण्या सामान्यत: नाकारण्यात आल्या पाहीजेत आणि अश्या कालाबाहय झालेल्या बाबींच्या मागणीचे प्रदान परिषदेच्या मंजुरीविना देण्यात येवू नये असे नमुद केलेले असल्याने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम १९० (४) नुसार मक्तेदार श्री.कमर्शियल,जळगांव यांना अनामत परतावा रक्कम रु.१०.०००/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं.३)** थोर राष्ट्रीय पुरुष यांचे पुतळयाचे सुशोभिकरण करणे कामी यु.क्र.७ अंतर्गत महात्मा गांधी उद्यानातील विर सावरकर पुतळा सुशोभिकरण करणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार भुषण अशोक जावळे यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रु.१५५४०/- परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

सौ.शुचिता हाडा :- मक्तेदार भुषण जावळे यांची इसारा अनामत बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, थोर राष्ट्रीय पुरुष यांचे पुतळयाचे सुशोभिकरण करणे कामी यु.क्र.७ अंतर्गत महात्मा गांधी उद्यानातील विर सावरकर पुतळा सुशोभिकरण करणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार भुषण अशोक जावळे यांनी पावती क्रं.०२०७१ दि.०९/१२/२०१४ अन्वये इसारा अनामत रक्कम रु.१५५४०/- मात्र म.न.पा.खजिन्यात भरलेली आहे.

सदरचे काम पुर्ण होवून ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे इसारा अनामत म्हणुन भरलेली रक्कम परत मिळण्याची मागणी केलेली आहे. सदरची इसारा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करायचे असल्यास मा.महासभेची मान्यता घेवून करता येणार असल्याने त्यानुसार मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १९० (४) अन्वये अर्जदार भुषण अशोक जावळे यांना सदरची इसारा अनामत रक्कम रु. १५५४०/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं.४)** आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१ दांडेकर यांच्या घरापासुन बडगुजर यांचे घरापर्यंत स.नं.३३०/१ रोड दोन्ही बाजुस गटार बांधणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन, जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रु.२६००/- परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

सौ.शुचिता हाडा :- मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन यांची इसारा अनामत बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१ दांडेकर यांच्या घरापासुन बडगुजर यांचे घरापर्यंत स.नं.३३०/१ रोड दोन्ही बाजुस गटार बांधणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन, जळगांव यांनी पावती क्रं.१४७६४ दि.१३/०८/२०१४ अन्वये इसारा अनामत रक्कम रु.२६००/- मात्र मनपा खजिन्यात भरलेली आहे.

सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे इसारा अनामत म्हणुन भरलेली रक्कम परत मिळण्याची मागणी केलेली आहे. सदरची इसारा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करायचे असल्यास मा.महासभेची मान्यता घेवून करता येणार असल्याने त्यानुसार मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १९० (४) अन्वये मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन, जळगांव यांना सदरची इसारा अनामत रक्कम रु. २६००/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं.५)** आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१ मधील केसर बाग व इंद्रप्रस्थ नगर तसेच जनाई नगर भागात नविन आर.सी.सी. गटार बांधणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार हर्षदा प्रभाकर काळे, जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रु.५९००/- परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

सौ.शुचिता हाडा :- मक्तेदार हर्षदा काळे यांची इसारा अनामत बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१ मधील केसर बाग व इंद्रप्रस्थ नगर तसेच जनाई नगर भागात नविन आर.सी.सी. गटार बांधणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार हर्षदा प्रभाकर काळे, जळगांव यांनी पावती क्रं.१४७८७ दि.२०/०८/२०१४ अन्वये इसारा अनामत रक्कम रु.५९००/- मात्र मनपा खजिन्यात भरलेली आहे.

सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे इसारा अनामत म्हणुन भरलेली रक्कम परत मिळण्याची मागणी केलेली आहे. सदरची इसारा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करायचे असल्यास मा.महासभेची मान्यता घेवून करता येणार असल्याने त्यानुसार मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १९० (४) अन्वये मक्तेदार हर्षदा प्रभाकर काळे, जळगांव यांना सदरची इसारा अनामत रक्कम रु. ५९००/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं.६)** सन २०१८-१९ चे वार्षिक मंजुर दरात विद्युत विभाग युनिट क्र.१ ते ४ चे कार्यक्षेत्रात येणारे पथदिवे व्यवस्था दुरुस्ती कामी लागणारे विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**नगरसचिव :- विषय क्रं.६ व विषय क्रं.१३ हे दोन्ही विषय एकच असल्याने विषय क्रं.६ रद्द करणेत येत असुन याबाबत विषय क्रं.१३ वर निर्णय घेण्यात येईल.**

**नगरसचिव :- विषय क्रं.७)** मनपा सार्व.बांधकाम विभागा अंतर्गत शहरातील रस्ते दुरुस्ती कामी ३ ट्रक्टर व ९ मजुर पुरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- रस्ते दुरुस्ती कामी ३ ट्रॅक्टर व ९ मजुर पुरविणेचा प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

सौ.ज्यांती चव्हाण :- एक डोझर ४० दिवसांसाठी भाडयाने लावणेत यावे.

श्री.डि.एस.खडके :- बांधकाम विभागाला याची आवश्यकता नाही.

मा.आयुक्त :- हा विषय वेगळा आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदय, ४० दिवसांसाठी जो काही खर्च अपेक्षित आहे त्यापेक्षा आपण नविन ट्रॅक्टर खरेदी करावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, सार्व.बांधकाम विभागा अंतर्गत एकुण १० युनिट असून प्रत्यक्षात पाच युनिट कडे

ट्रॅक्टर आहेत ते सुध्दा कालबाहय झालेले आहेत त्यातील दोन ट्रॅक्टर अतिक्रमण विभागाकडे मा.आयुक्त सो. यांचे आदेशानुसार देण्यात आलेले आहे त्यामुळे विभागाकडे फक्त तिन ट्रॅक्टर शिल्लक आहेत.

रस्ते दुरुस्ती करीता कमीत कमी तीन ट्रॅक्टर लागतात (१ इंची खडी, १/२ खडी व ६ एम.एम.कच करीता प्रत्येकी एक ट्रॅक्टर) त्यामुळे डांबर पट्टी वर ट्रॅक्टर पाठविले तर इतर कामाकरीता एकही ट्रॅक्टर शिल्लक राहत नाही करीता १२ महिन्याकरीता ३ ट्रॅक्टर व ९ मजूर लावण्याकरीता अंदाजे रक्कम रु.३३,४५,२२५/- मात्रचे खर्च लागणार आहे विभागाने रस्ते दुरुस्ती करीता रक्कम रु.१.०० कोटी मात्रची तरतुद केलेली आहे.

तरी रक्कम रु. ३३,४५,२२५/- मात्रचे खर्चास व निविदा प्रसिध्द करणेस तसेच त्या कालावधी पर्यंत पुर्वीचे मक्तेदार एस के कॉन्ट्रॅक्टर,जळगांव यांचे कडुन काम करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे

प्रशासनाने सदर कामी पि.एफ रजिस्टेशन असल्या शिवाय कोणत्याही मक्तेदारास काम देण्यात येऊ नये तसेच इतर अनुषंगीक बाबींची नियमानुसार पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं.८)** शासनाने मंजुर केलेल्या महानगरपालिका हद्दीत विकास कामे करणे कामी रक्कम रु.२५ कोटी विशेष अनुदाना अंतर्गत उर्वरित रक्कम रु.७ कोटी अनुदान अंतर्गत कामांना मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- विशेष अनुदान रु.२५ कोटी अंतर्गत उर्वरीत रु.७ कोटीच्या कामांबाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

श्री.नितीन लढ्ढा :- प्रस्ताव मान्य करावा परंतू मागे मेहरुण तलावाचे ट्रॅकसाठी नऊ कोटी रुपये मंजूर केले होते त्यासाठी पाठपुरावा करावा. २५ कोटी रुपयांचे निधीत हे दर्शविलेले होते.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, शासनाने मंजुर केलेल्या महानगरपालिका हद्दीत विकास कामे करणे कामी रक्कम रु.२५ कोटी विशेष अनुदाना अंतर्गत उर्वरित रक्कम रु.७ कोटी अनुदान अंतर्गत यापुर्वीच रक्कम रु.१८.०६ कोटी मात्रचे खाली नमुद प्रमाणे कामांना शासनाने शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६ प्र.क्रं.१७१ (२६)/नवि-१६ मंत्रालय,मुंबई दि.१९/०४/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | विविध प्रभागात आर.सी.सी.गटार बांधणे |
| २ | विविध प्रभागात पुलाचे बांधकाम करणे |
| ३ | इच्छादेवी ते डि मार्ट व कोर्ट चौक ते गणेश कॉलनी पर्यंतचे विज वाहीनी रस्त्याच्या दुभाजकात स्थलांतरीत करणे |
| ४ | वाढीव भागात दिवा बत्तीची व्यवस्था करणे कामी पोल उभारणे |
| ५ | ट्रॉफीक गार्डन विकसीत करणे |
| ६ | इच्छादेवी ते डि मार्ट व कोर्ट चौक ते गणेश कॉलनी पर्यंत दुभाजक बांधणे |
| ७ | वाघुर वॉटर पंपीग येथे ट्रांन्सफार्मर बसविणे, ५०० एच.पी.चे दोन पंप बसविणे, ६ नग स्लुईस वॉल बसविणे |

वर नमुद कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर अनुदाना अंतर्गत शहरात एल ई डी पथदिवे बसविणे रक्कम रु.७.०० कोटी मात्रचे काम मा.पालक मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत रद्द करण्यात आले असल्याचे इतिवृत्तात नमुद करण्यात आले. त्यानुसार उक्त कामाचे शिल्लक असलेले रक्कम रु.७.०० कोटी मात्रचे अंतर्गत खालील नमुद प्रमाणे कामे करण्यास सदर बैठकित मान्यता दिलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | वाढीव भागात दिवाबत्तीची व्यवस्था करणेकामी पोल उभारणेची कामे करणे. | ५१.०० |
| २ | महानगरपालिका प्रशासकीय इमारत येथील जूने सहा.उद्वाहके निष्काषीत करुन त्या जागी नीवन सहा उद्वाहके बांधणे | २२५.०० |
| ३ | नॅशनल हायवे नं.६ पासून ते कब्रस्थान पर्यंतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | १००.३१ |
| ४ | गोपाळपूरा नाला ते जूना नशिराबाद रोड पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | ११७.६९ |
| ५ | वाल्मीक नगर पुलापासुन ते कोळी पेठ पुला पर्यंतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | ४०.६५ |
| ६ | वार्ड क्रं.१६ मध्ये श्रीधर नगर जवळील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | ५.०५ |
| ७ | शिवाजी नगर दुध फेडरेशन रोडवरील खडके चाळ पासून ते सुरत रेल्वे गेट पर्यंतच्या रोडवर दुभाजक बांधणे व रंगकाम करणे. | ३७.७४ |
| ८ | फुले मार्केटपासुन ते नेरी नाका ते एस.टी.वर्कशॉप पर्यंतच्या दुभाजकाची उंची वाढविणे. | ३३.५० |
| ९ | वैकुंठधाम मुख्य स्मशानभुमीत गॅस दाहीनी बसविणे. | ८५.०० |
| | एकुण :- | ६९५.९४ |

वर नमुद १ ते ९ कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदरचा प्रस्ताव तात्काळ मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी सो. यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. अनुदानापेक्षा जास्त होणारा खर्च म.न.पा.फंडातून करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं.९)** शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र./१८३/नवि-२० दि.१२ जानेवारी २०१८ तसेच महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.३७८/ऊर्जा-७ दि.२२ जुन २०१७ नुसार जळगांव शहरात ईईएसएल च्या माध्यमातुन एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविणेचा प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेले पथदिवे (टयुब फिक्चर /सोडीअम फिटींग/टी-५ फिटींग/मेटल हॅलाईर्ड फिटींग) निष्काशीत करुन त्या जागी एलईडी पथदिवे बसवुन विज वापरात तसेच विज बिलाच्या खर्चात बचत करण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तुत काम हे शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२०/ दि.१२/०१/२०१८ व शासन निर्णय क्र.ऊपाऊ२०१५/प्र.क्र.३७८/ऊर्जा-७/ दि.१२/०१/२०१८ अन्वये ईठएसएलच्या माध्यमातुन एस्को तत्वावर राबविण्यात बाबत सुचीत केलेले आहे. सदरचा प्रकल्पाकामी मागणी केल्या प्रमाणे ईईएसएल ला आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असता त्यांनी प्रस्तुत कामा संदर्भात प्रस्ताव तयार करुन प्रस्ताव व करारनाम्याचा मसुदा महानगरपालिकेला ई-मेल व्दारे सादर केलेला आहे. या संदर्भा ईईएसएल यांचे पत्र क्र.EESL/MH/SLNP/2018/Amrut City/Agreement/012 Date :21/05/2018 अन्वये प्राप्त झालेले असुन त्यांनी दि.३१ मे २०१८ पर्यत करारनामा करावा जेणे करुन २०१८ पासुन काम सुरु करता येईल असे कळविलेले आहे.

ईईएसएल यांनी जो प्रस्ताव सादर केलेला असुन त्यांनी सादर केलेला प्रस्ताव व करारनाम्यानुसार प्रमुख ठळक बाबी खालील प्रमाणे.

- ईईएसएल मार्फत जळगांव शहरातील आज रोजी अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांची त्या करीताची संपुर्ण यंत्रणा, यंत्रणेची सद्यस्थिती याची पाहणी करणे.
- एलईडी पथदिवे बसविण्यापुर्वीची तसेच प्रायोगीक तत्वावर एलईडी पथदिवे बसविल्यानंतरची पथदिव्यांची प्रकाश पातळी लक्स लेव्हलची पडताळणी संयुक्तीकपणे करणे.
- करारनाम्यानुसार निश्चीत केलेल्या तांत्रिक स्पेसिफिकेशननुसार एलईडी पथदिवे सेंट्रलाईज कन्ट्रोल सिस्टिम बसविणे व मक्त्याच्या कालावधीत त्यांची देखभाल दुरुस्ती करणे.
- अस्तित्वात असलेले सर्व चालु तसेच बंद पथदिवे निष्काशीत करुन त्या जागी आवश्यक साहित्यासह एलईडी पथदिवे बसविणे.
- रस्त्यावर आवश्यक असलेला प्रकाश विचारात घेऊन नॅशनल लाईटींग कोड तसेच इंडीयन स्टॅर्डडनुसार पोलवर योग्य क्षमतेचे एलईडी पथदिवे बसविणे.
- अस्तित्वात असलेले पोल तसेच यंत्रणा नॅशनल लाईटींग कोड तसेच इंडीयन स्टॅर्डड नुसार नसल्यास त्याचे नुतणीकरण करण्याबाबत महानगरपालिकेला सुचित करणे.
- नविन एलईडी पथदिवे बसवित असतांना पोलवरील जुने अस्तित्वात असलेले पथदिवे ईईएसएल मार्फत निष्काशीत करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणे.
- ईईएसलला कमीतकमी ५०% विज बचत करणे बंधनकारक राहील त्याची तपासणी ईईएसल प्रतिनिधी व मनपा प्रतीनिधी संयुक्तिकपणे करेल.

- कमीतकमी ९५% पथदिवे सुरु राहतील याची दक्षता घेणे ईईएसएलला बंधनकारक आहे.
- बंद पथदिवे ४८ तासाच्या आत बदलविणे ईईएसएलला बंधनकारक आहे.
- पथदिव्यांची व्यवस्था दुरुस्तीचे काम तात्काळ होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त पथदिवे ईईएसएल कडे असणे बंधनकारक आहे.
- नैसर्गीक आपत्ती चोरी, जाळपोळ दंगली, उच्च विजदाब इ.मुळे होणाऱ्या एलईडी पथदिव्यांची होणाऱ्या नुकासनीची जवाबदारी वगळता मक्ता कालावधीत एलईडी पथदिव्याची वॉरंटी तथा हमी (Manufacturing defects) ची जवाबदारी ईईएसएलची असेल. पथदिव्यांच्या विमा पॉलीसी ईईएसएल काढेल मात्र आवश्यक तो प्रीमीयम तथा अधिमुल्याची भरपाई महानगरपालिकेला करेल.
- पथदिव्यांची तुटफट झाल्यास नविन पथदिव्यांकरीता लागणारा खर्च ईईएसएलला द्यावयाची आहे.
- पथदिव्यांच्या संदर्भात (Performance / efficiency) काही वाद उद्‌भवल्यास व पथदिव्यांमध्ये काही तांत्रीक दोष उद्‌भवल्यास स्वखर्चाने बदलविण्याची जवाबदारी ईईएसएलची असेल.
- करार कालावधीत अपघात झाल्यास त्यांची जवाबदारी ईईएसएलची असेल.
- काम पुर्ण झाल्यानंतर व त्या संदर्भात मनपाने नाहरकत दाखला दिल्यानंतर ईईएसएलने निविदेकरीताची बँक गॅरंटी मुक्त (Release) करणे आहे.

**दंडात्मक कार्यवाही तथा पेनल्टी**

अ) एकुण पथदिव्यांपैकी ९५% पथदिवे कार्यान्वीत राहतील याची दक्षता ईईएसएलला घ्यावयाची असुन ९५% पेक्षा पथदिवे कार्यान्वीत नसल्यास खालील प्रमाणे महानगरपालिका दंडात्मक कारवाई /पेनल्टी करेल.

पेनल्टी = (बंद पथदिव्यांचे एकुण वॅटेज (९५% पेक्षा कमी असलेली संख्या ) x १२ तास x एकुण दिवस x विज दर) / १०००

ब) ४८ तासात बंद पथदिवे बदलविण्याची कार्यवाही ईईएसएलला करावयाची असुन ४८ तासात बंद पथदिवे न बदलविल्यास खालील महानगरपालिका दंडात्मक कारवाई / पेनल्टी करेल.

पेनल्टी = (बंद पथदिव्यांचे एकुण वॅटेज (४८ तासात न बदलविलेल्या पथदिव्यांचे ) x १२ तास x एकुण दिवस(४८ तास वगळता) x विज दर) / १०००

**पेमेंट अदायगीबाबत**

सदरहु प्रकल्प राबविण्या कामी जळगांव शहर महानगरपालिकेला सुरवातीस कोणत्याही खर्च करावयाचा नाही. संपुर्ण खर्च ईईएसएल करणार असुन एलईडी पथदिवे बसविण्याची कार्यवाही झाल्यानंतर तथा काम पुर्णत्वाचा रिपोर्ट झाल्यानंतर ईईएसएलचे केलेल्या खर्चापोटी त्यांनी सादर केलेल्य प्रस्तावानुसार दर महिन्याला रक्कम अदा करावयाची आहे.

अदा करावयाची रक्कम ही महाराष्ट्रातील शेडयुल बँकेत एस्क्रो (Escrow) खाते उघडुन त्याखात्या मार्फत दर महिन्याला दयावयाची आहे. या खात्यात कमीत कमी एकुण ३ महिने अदा करावयाची रक्कमे इतकी रक्कम शिल्लक ठेवावी लागणार आहे. ईईएसएलने रक्कमेची मागणी केल्यानंतर तथा बिल दिल्यानंतर १५ दिवसात रक्कम अदा करावयाची आहे. मासीक बिल दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत रक्कम तथा पेमेण्ट अदा केल्यास ०.५% सुट व ७ ते १५ दिवसात रक्कम तथा पेमेण्ट अदा केल्यास ईईएसएल कडुन सुट (Rebate) देण्यात येणार आहे. तथापी जर सदरची रक्कम अदा करण्यास उशीर झाला असता थकीत रक्कमेवर २% जादाची रक्कम (मासीक दराने ) दर दिवसाला अदा करावायची आहे.

**वाद उद्भवल्यास**

- कामा संदर्भात अथवा पेमेंट संदर्भात काही वाद उद्‌भवल्यास सदरचा वाद सामंज्यास्याने ३० दिवसाच्या आत सोडवायचा आहे.
- जळगांव महानगरपालिका कराराचे उल्लंघन करत असेल तर ईईएसएलव्दारा जळगांव महानगरपालिकेला टरमिनेशनची नोटीस देवुन ३० दिवसात आवश्यक ती उपाय योजना करण्याबाबत सुचवेल.
  महानगरपालिकेने दिलेल्या कालावधीत उपाय योजना न केल्यास करार संपुष्टात येईल.
  तसेच ईईएसएलने कराराचे उल्लंघन केल्यास टरमिनेशन नोटीस देण्याचा अधिकार तसेच करार संपुष्टात आणण्याचा अधिकार महानगरपालिकेला असेल.
- जळगांव महानगरपालिकेने कराराचे उल्लंघन केल्यास व त्यामुळे ईईएसएलचे नुकसान झाल्यास ईईएसएलच्या होणाऱ्या नुकसानाची भरपाई महानगरपालिकेस ईईएसएलने कळविल्यानंतर ३० दिवसाच्या आत करावयाची आहे.
- महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात काही बदल झाला तरी करार अबाधीत राहील.
- दोन्हीमध्ये काही वाद उद्‌भवल्यास व तो चर्चेमधुन वाद न सुटल्यास दोन्हींनी लवादा संदर्भात असलेल्या अक्ट १९९६ (Arbitrator and conciliatation Act 1996) प्रमाणे कार्यवाही करेल. मध्यस्थिची नियुक्ती करुन त्यांच्या माध्यमातुन वाद सोडवण्यात येईल. लवाद प्रक्रियाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य

| |
|---|
| ऊर्जा बचत होणार असल्याने सीडीएम अंतर्गत UNFCCC यांच्या कडे नोंदणी करण्याचा व सीडीएम व्यव्हारातुन मिळालेल्या उत्पन्नावर महानगरपालिकेचा अधिकार राहणार. |

महानगरपालिकेने ईईएसएलला उपलब्ध करुन दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार ईईएसएलने महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केलेला असुन प्रत्यक्षात ईईएसएल तसेच मनपा मार्फत संयुक्तीक सर्वे करुन एलईडी बसविणे बाबत रोडवरील पोलची उंची लक्स लेव्हल, रस्त्याची रुंदी याबाबींची पाहणी करुन तशा प्रकारचे अंतीम प्रस्तावात बदल होण्याची शक्यता आहे.

करार कालावधी ७ वर्ष इतका राहणार असुन करार कालावधीत एलईडी पथदिवे बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामाचा अंतर्भाव आहे.

प्रस्तृत कामी सुरवातीचा प्राथमिक संपुर्ण खर्च ईईएसएल मार्फत करण्यात येणार असुन कामाची अंबलबजावणी केल्यानंतर विज वापरात होणाऱ्या बचतीनुसार विज देयकात होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतुन ईईएसएलने करीत असलेल्या खर्चापोटी तथा परतावाची रक्कम एस्क्रो अकाऊंट (Escrow Account) मधुन अदा करावयाची आहे.

ईईएसएल मार्फत करण्यात येणारे काम, त्या करीता येणारा प्राथमिक खर्च यासह करार कालावधीत देखभाल दुरुस्ती कामी येणारा दैनंदिन खर्च, एकंदरीत प्रकल्पाचा एकुण खर्च, ईईएसएलला अदा करावयाची परतावा रक्कम यांच्या तपशीलासह सविस्तर प्रस्ताव व करारनामा मसुदा ईईएसएलने सादर केलेला असुन त्यांनी सादर केलेल्या करारनामा मसुदा अंतीम राहणार आहे.

ईईएसएलने दिलेल्या प्रस्तावानुसार एलईडी पथदिवे बसविल्यानंतर एका वर्षात विज बचत ३.२६ दश लक्ष युनिट विज बचत होणार असुन त्याच प्रमाणात विज देयकात बचत होणार आहे तसेच करार कालावधीनंतर ईईएसएलला परतावा रक्कम साधारण रक्कम रु.१३८८७५७४०.६० मात्र अदा केल्यानंतर रक्कम रु.५.२५ कोटी मात्र महानगरपालिकेचा फायदा अपेक्षित आहे. रस्त्याची रुंदी , पोलची उंची सतचे रस्त्यावर आवश्यक असलेली प्रकाश पातळी यासह सर्व तांत्रिक बाबी तपासुन प्रत्यक्षात काम करतांना योग्य त्या क्षमतेचे एलईडी पथदिवे बसविण्यात येणार असल्याने प्रकल्पाचा खर्च होणारी विज बचत, ईईएसएलला द्यावयाची परतावा रक्कम तसेच करार कालावधीनंतर मनपाला होणारा फायदा यामध्ये काही प्रमाणात बदल होण्याची शक्यता आहे.

एलईडी पथदिवे बसविल्यानंतर निश्चितपणे विज वापरात बचत होणार आहे व त्या समप्रमाणात विज देयकात बचत होणार आहे. तसेच करार कालावधीत त्यांची देखभाल दुरुस्ती ही ईईएसएलच्या माध्यमातुन करण्यात येणार असल्याने नागरीकांना दिवाबत्तिची सुविधा चांगल्या प्रकारे देता येणार असुन विज वापरात बचत करण्याचे शासनाचे स्पष्ट निर्देश असुन ईईएसएलने सादर केलेला प्रस्ताव स्विकारणे ही बाब धोरणात्मक आहे.

ईईएसएलने प्रस्तावासोबत करारनामा मसुदा सादर केलेला असुन करारनामा मसुदा विधी विभागाकडुन तपासुन त्यांचा अभिप्राय तसेच प्रस्तृत कामी दर्शविण्यात आलेली खर्चाचा तसेच परतावा रक्कमेचा तपशील मनपाने नियुक्त केलेल्या सीए कडुन तपासुन त्यांचा अभिप्राय व शासनाचे निर्देशानुसार घेवुन एलईडी पथदिवे बसवुन विज वापरात बचत करण्याचे काम ईईएसएलच्या माध्यमातुन एस्को तत्वावर करणे बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येत असुन सोबतच्या करारनामा मसुदास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **पाटील सचिन भिमराव** | |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील चंद्रशेखर शिवाजी** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.१०)** जळगांव महानगरपालिकेतील लिपीक या पदाची सेवा नागपुर जिल्हयातील सावनेर नगरपरिषद किंवा इतर कोणतीही नगरपरिषद (नागपुर जिल्हयातील) येथे लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणुक देणे कामी सौ.प्रिती रतनलाल बावनकर (प्रिती वनवास मेंढे) लिपीक, आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- सौ.प्रिती बावनकर यांचा जिल्हा बदली बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, सौ.प्रिती रतनलाल बावनकर (प्रिती वनवास मेंढे) यांचे पती नागपूर येथे सेवेत असून त्यांचे सासु-सासरे वृध्द असल्याने तसेच पती पत्नी यांना एकत्रीत ठेवण्याच्या धोरणानुसार सौ.बावनकर यांची जळगांव महानगरपालिकेतील लिपीक या पदाची सेवा नागपुर महानगरपालिका, सावनेर नगरपरिषद किंवा इतर कोणतीही नगरपरिषद (नागपुर जिल्हयातील) येथे लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणुक देणे कामी सौ.प्रिती रतनलाल बावनकर (प्रिती वनवास मेंढे) लिपीक,आरोग्य विभाग (सदया कार्यरत आस्थापना विभाग), म.न.पा. जळगांव यांना ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही पुर्ण करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **पाटील सचिन भिमराव** | |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील चंद्रशेखर शिवाजी** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.११)** शासन निर्णय वित्त विभाग, दि.५ एप्रिल २०१० अन्वये कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वाहतुक भत्त्याच्या दरात महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५, दि.३ जुन २०१४ अन्वये सुधारणा झाल्याने फरकाची रक्कम अदा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- वाहतुक भत्याच्या दरात फरकाची रक्कम अदा करणे बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, महासचिव,अखिल भारतीय सफाई मजदूर कॉग्रेस महाराष्ट्र प्रदेश यांचे दि.१९/०३/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून, सदर पत्रान्वये वाहतूक भत्याच्या फरकाची थकबाकीची रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५, दि.३ जून,२०१४ प्रशासनास प्राप्त झाले आहे. या शासन निर्णयात " केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने दि.२९ ऑगस्ट,२००८ रोजीच्या आदेशान्वये त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून सुधारीत दराने वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर केलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम,२००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.१

जानेवारी,२००६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्याच्या दरांत वरील दिनांक ५ एप्रिल,२०१० च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. तथापि सदयस्थितीत इंधनाचे वाढलेले दर व त्यानुषंगाने वाहतूकीच्या भाडयात झालेली वाढ लक्षात घेता, सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वाहतूक भत्याच्या दरात शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ५ एप्रिल,२०१० अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील दरांमध्ये दिनांक १ एप्रिल,२०१४ पासून खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन (रु.) | दरमहा वाहतूक भत्याचा दर (रु.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणी |
| १ | रु.५४००/-व त्याहून अधिक | २४००/- | १२००/- |
| २ | रु.४४००/-व त्याहून अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.१२००/- | रु.६००/- |
| ३ | रु.४४००/-व त्याहून कमी | रु.४००/- | रु.४००/- |

तसेच अंध, आस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असणाऱ्या वाहतुक भत्त्यामध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन (रु.) | दरमहा वाहतूक भत्याचा दर (रु.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणी |
| १ | रु.५४००/-व त्याहून अधिक | ४८००/- | २४००/- |
| २ | रु.४४००/-व त्याहून अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.२४००/- | रु.२०००/- |
| ३ | रु.४४००/-व त्याहून कमी | रु.२०००/- | रु.२०००/- |

उपरोक्त दोन्ही तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शहराचे वर्गीकरण केलेले असुन जळगांव शहर हे इतर ठिकाणाच्या श्रेणीत येत असुन जळगांव शहर महानगरपालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५, दि.३ जुन २०१४ अन्वये माहे १ एप्रिल २०१७ पासुन जळगांव शहर महानगरपालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत दराने वाहन भत्ता लागु करण्यात आलेला आहे.

त्यामुळे माहे १ एप्रिल २०१४ ते माहे ३१ मार्च २०१७ पावेतोचा वाहतुक भत्ता (Transport Allowance) फरकाची रक्कम अदा करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला असुन मा.महासभा ठराव क्र.११० दि.२५/०७/२०१४ ला पारीत झालेला असुन त्यात महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरी नसल्यामुळे प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला होता. म्हणुन माहे १ एप्रिल २०१४ पासुन सुधारीत वाहतुक भत्ता लागु करण्यात आलेला नाही. त्यामुळे वाहतुक भत्ता

(Transport Allowance) माहे १ एप्रिल २०१४ ते माहे मार्च २०१७ पावेतोच्या फरकाची रक्कम अद्याप पावेतो अदा करण्यात आलेली नाही.

तरी शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४ /प्र.क्र.५/सेवा -५ दि.३ जुन २०१४ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेतील पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत दराने १ एप्रिल २०१४ ते माहे ३१ मार्च २०१७ पावेतोच्या कालावधीतील होणाऱ्या फरकाच्या थकबाकीची अंदाजीत रक्कम रु.१,८०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी ऐंशी लक्ष मात्र ) अदा करणेस बाकी आहे. परंतु सन २०१४ पासुन तर आज २०१८ पावेतो महानगरपालिकेच्या अर्थिक परिस्थितीत बदल झालेला नाही. आर्थिक परिस्थिती सुधरल्यास सदर प्रस्ताव फेर सादर करता येईल.

प्रशासनाने सदर कामी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील सचिन भिमराव**
**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं.१२)** प्रभाग समिती क्र.१ ते ४ अंतर्गत शहरातील म.न.पा.च्या खुल्या जागा व भुखंड जे.सी.बी. व्दारे साफ सफाई करुन ट्रॅक्टरच्या सहाय्याने कचऱ्याचे ढिग उचलुन वाहतुक करणे कामी रक्कम रु.२०,४८,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- जेसीबी, ट्रॅक्टरव्दारे मनपा जागा व भुखंड साफसफाई तसेच कचरा डेपो वरील कामकाजासाठी डोझर भाडे तत्वावर लावणेच्या खर्चाचा बाबत प्रशासनाचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

सौ.ज्यांती चव्हाण :- एक डोझर ४० दिवसांसाठी भाडयाने लावणेत यावे.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदय, मनपाकडे एक डोझर आहे व नविन घेणेसाठी एक कोटी रुपये लागतील आपण भाडयाने लावा परंतू कायमस्वरुपीसाठी प्रस्ताव तयार करावा.

मा.आयुक्त :- नियमाप्रमाणे शासनाकडून मार्गदर्शन घेऊ त्यानंतर कार्यवाही करु.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव शहरात साथीच्या रोगाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेले असून डेंग्यू, मलेरिया इ. अदृष्य साथीच्या रोगांवर नियंत्रण करणे करीता मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे, मा.महापौर, मा.उपमहापौर यांनी म.न.पा. सभागृहात दि.२९/०९/२०१८ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत आरोग्य विषय समस्यांचे निवारण कामी शहरातील वार्ड निहाय म.न.पा.च्या खुल्या जागा व भुखंड जे.सी.बी. व्दारे साफ सफाई करुन ट्रॅक्टरच्या सहाय्याने कचऱ्याचे ढिग उचलून वाहतूक करणे आढावा बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार वरील कामे करण्याकरीता प्रभाग अधिकारी यांचेमार्फत शहरातील १९ वार्ड (अ,ब,क,ड) विचारात घेता प्रती वार्ड निहाय २ दिवस साफ सफाईचे नियोजन करुन प्रभाग निहाय एक जे.सी.बी. प्रमाणे ४ जे.सी.बी. व ३ ट्रॅक्टर,१ डोझर बाजार भावाने ४० दिवस भाडेतत्वावर लावणे कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे. तसेच याकामी मनपा सभेमध्ये सन्मा.सदस्या सौ.ज्योती चव्हाण यांनी सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे एक डोझर यामध्ये भाडयाने घेणे बाबत चर्चा झालेप्रमाणे खालील दुरुस्ती करण्यात येत आहे.

| प्रभाग क्रं. | वाहनाचा प्रकार | संख्या | कालावधी | बाजार भाव | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ ते ४ | जे.सी.बी.वाहन चालक व इंधनासह | ०४ | (४० दिवस प्रती दिन ८ तासा प्रमाणे १२८० तास) | रु.८५०/- प्रती तास | रु.१०,८८,०००/- |
| | ट्रॅक्टर ट्रोली (वाहन चालक व इंधनासह) | १२ | (४० दिवस प्रती दिन ८ तासा प्रमाणे ३२० तास) | रु.२०००/- प्रती दिवस | रु.९,६०,०००/- |
| | डोझर (वाहन चालक व इंधनासह) | ०१ | (४० दिवस प्रती दिन ८ तासा प्रमाणे ३२० तास) | रु.२९००/- प्रती तास | रु.९,२८,०००/- |
| | | | | **एकूण -** | **रु.२९,७६,०००/-** |

प्रभाग निहाय १ जे.सी.बी. व ३ ट्रॅक्टर, या प्रमाणे चार प्रभागाकरीता ४ जे.सी.जी. व १२ ट्रॅक्टर, व १ डोझर (घनकचरा प्रकल्पासाठी) वाहन चालक व इंधनासह ४० दिवसाकरीता एकूण रक्कम रु.२९,७६,०००/- खर्च अपेक्षीत असून सदरचा खर्च हा १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून घनकचरा संकलन व वाहतूक या शिर्षाखाली करता येईल.

प्रशासनाने प्रस्तावीत केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार ई-निविदा प्रसिध्द करणेस व सदर खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.२९,७६,०००/- खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं.१३)** सन २०१८-१९ चे वार्षिक मंजुर दरात विद्युत विभाग युनिट क्र.१ ते ४ चे कार्यक्षेत्रात येणारे पथदिवे व्यवस्था दुरुस्ती कामी लागणारे विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदी करणे कामी रक्कम रु.४,१५,६०२/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- पथदिवे व्यवस्था दुरुस्ती कामी विदयुत साहित्य खरेदी करणेचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

श्री.नितीन लढ्ढा :- विषय क्रं.६ मध्ये दिलेले आहे की, जीईएम पोर्टलवर खाते उघडले गेले नाही.

मा.आयुक्त :- आता नविन खाते उघडण्यात येईल.

श्री.नितीन लढ्ढा :- चार चार महिने होवुन सुध्दा खाते कां उघडले जात नाही ?

मा.आयुक्त :- एक वर्षापासून हे झाले नाही.

श्री.नितीन लढ्ढा :- आता हे तातडीने होईल कां ?

मा.आयुक्त :- होईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, विद्युत विभाग युनिट क्र.१ ते ४ चे कार्यक्षेत्रात येणारे पथदिवे व्यवस्था दुरुस्ती कामी लागणारे विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदी करावयाचे आहे.

| अ.क्र. | विदयुत साहित्याचे नांव | खरेदी करावयाची संख्या |
|---|---|---|
| १ | ३६ वॅट टयुब नळी | ३००० नग |
| २ | ७० वॅट सोडी.बल्ब | ६५ नग |
| ३ | २५० वॅट सोडी बल्ब | ९० नग |
| ४ | १५० वॅट सोडी कॉपर चोक | ४० नग |
| ५ | ३६/४० वॅट टयुब कॉपर चोक | ५०० नग |
| ६ | ३६/४० वॅट टयुब स्टार्टर | २५०० नग |
| ७ | १५० वॅट सोडी बल्ब | ७५ नग |
| ८ | २५० वॅट मेटल हॅला.बल्ब | ५० नग |
| ९ | ७०/८० वॅट सोडी.कॉपर चोक | ४० नग |
| १० | २५० वॅट सोडी. कॉपर चोक | ६० नग |
| ११ | ७०/१५०/२५०/४०० वॅट सोडीयम इग्नीटर | ५०० नग |

शासन निर्णयातील विहित कार्यपध्दती नुसार महानगरपालिकेने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन मनपा प्रशासकीय आदेश क्रं.०२ दि.१२/०४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षा करीता विदयुत साहित्याचे वार्षिक करीता विदयुत साहित्याचे वार्षिक दर मंजुर केलेले आहेत/ वार्षिक दर करार केलेला आहे. तसेच आर्थिक वर्षात एकुण रक्कम रुपये २४,६७,३७६/- मात्रच्या खर्चाच्या रक्कमेचे विदयुत साहित्य खरेदी करणेस मान्यता प्राप्त झालेली आहे.

दि.२४/०८/२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार GEM portal वर साहित्य खरेदी करण्याचे निर्देश आहेत.

सध्या श्रावण महिना सुरु झालेला असुन येत्या काही दिवसात दि.२/०९/२०१८ रोजी गोकुळाष्टमी दि.१३/०९/२०१८ पासून सार्वजनिक गणेश उत्सवासह, मोहरम असे टप्पाटप्पाने इतर सार्वजनिक उत्सव येत असल्याने शहरातील बंद पथदिवे कार्यान्वीत करणे कामी मा.आमदार श्री.सुरेश दमु भोळे तसेच नवनिर्वाचित सन्मा.नगरसेवक,पदाधिकारी यांनी शहरातील बंद पथदिवे कार्यान्वयीत करणे कामी बाबत सुचना केलेले आहे. तसेच सार्वजनिक उत्सव विचारात घेता म.पोलीस अधिक्षक यांनी गणेश उत्सव व मोहरम हे दोन्ही उत्सव एकाच वेळेस येत असल्याने शहरात अंधाराअभावी कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडु नये या करीता बंद पथदिवे कार्यान्वीत करणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. सदय परिस्थितीत पथदिवे दुरुस्ती कामी आवश्यक विदयुत साहीत्य GEM portal वर खरेदी करता न आल्याने बंद पथदिव्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तात्काळ विदयुत साहीत्य खरेदी करणे गरजेचे आहे. तात्काळ विदयुत साहीत्याची खरेदी करुन बंद पथदिवे कार्यान्वीत करणे बाबत वेळोवेळी शहराचे आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांनी सुचीत केलेले आहे.

दि.२४/०८/२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार GEM portal वर तीन व तीन पेक्षा कंपन्यांचे दर उपलब्ध झाल्यानंतरच साहीत्य खरेदी करता येते. उक्त नमुद उक्त नमुद अ.क्रं.१ ते ११ चे साहित्य खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला असता अ.क्रं.४,५,६,८,११ या विदयुत साहीत्यांचे एकाच पुरवठादारांचे दर उपलब्ध झालेले असल्याने व सबब दरांनी तुलना होऊ शकत नसल्याने सदरचे साहीत्य सन २०१८-१९ या वर्षाचे वार्षिक मंजुर दरानुसार वार्षिक मंजुर पुरवठादार मेगा सोल्युशन,भुसावळ यांचे कडून खरेदी करणेत आलेले आहे. अ.क्रं.१,२,३,७,९,१० च्या साहित्यांचा तुलनात्मक तक्ता प्राप्त झालेला आहे. मात्र अ.क्रं.१,२,३,७,९,१० चे साहित्य GEM portal वर खरेदी करणे कामी मनपाचे स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे. मात्र अदयाप पावेतो अर्थ विभागाने GEM portal करीता लागणारे स्वतंत्र बँक खाते उघडलेले नसल्याने GEM portal वर ऑन लाईन बिंडीग करता येत नाही. तसेच GEM portal करीता लागणारे बँक खाते उघडणेस व GEM portal वर साहित्य खरेदी करणे व तदनंतर साहित्य प्राप्त होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. बंद पथदिवे कार्यान्वीत करणे बाबतची मागणी विचारात घेता तसेच GEM portal वर साहीत्य खरेदी करणे कामी येणारी अडचण व लागणारा कालावधी विचारात घेता अ.क्रं.१,२,३,७,९,१० चे साहित्य हे सन २०१८-१९ या वर्षाचे वार्षिक मंजुर पुरवठादार मेगा सोल्युशन्स,भुसावळ यांचे कडून खरेदी करणेस मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे.

GEM portal करीता लागणारे स्वतंत्र बँक खाते उघडणेस व GEM portal वर साहित्य खरेदी करणे कामी आवश्यक ती कार्यपध्दती अवलंबिणे व तद्नंतर साहित्य प्राप्त होणेस बराच कालावधी लागणार असल्याने कामाची निकड लक्षात घेता GEM portal वर खरेदी करावयाचे अ.कं.१,२,३,७,९,१० चे विदयुत साहित्य हे मनपा प्रशा.आदेश क्रं.०१ दि.१२/०४/२०१८ अन्वये वार्षिक मंजुर दरात वार्षिक मंजुर पुवठादार मेगा सोल्युशन्स,भुसावळ यांना रक्कम रु.४,१५,६०२/- मात्रचे कार्यादेश निर्गमित करण्यात येवून त्यांचे कडून सदरचे विदयुत साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **मराठे जितेंद्र भगवान** | |
| **अनुमोदक** | **:-** | **काळे रेश्मा कुंदन** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.१४)** केंद्रपुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेसाठी स्थापीत करण्यात आलेल्या जिल्हा कृतीदलातील सदस्यांची नावे कळविणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडुन आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- केद्र पुरस्कृत वन स्टॉप सेंटर योजनेसाठी खालील प्रमाणे २ सन्मा.सदस्या व १ सन्मा.सदस्य यांचे नांवे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडेस सुचविण्यात येत आहेत.- १) नेरकर सरिता अनंत, २) चव्हाण ज्योती बाळासाहेब, ३) काळे अमित पांडुरंग

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जा.क्र.जिमबाविअज/वन स्टॉप सेंटर/कृतीदल/१३४३/२०१८ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, आकाशवाणी चौक जळगांव यांचे दि.२४/०८/२०१८ रोजी प्राप्त पत्रान्वये व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रंमाक:संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२२/का-२ दि.२३ मार्च २०१८ अन्वये जिल्हयात पिडीत महिलांसाठी केंद्रपुरस्कृत वन स्टॉप सेंटर ही योजना सुरु करण्याकरीता कृतीदल गठीत करण्यात आलेली आहे. या कृतीदलामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था/नगरपालिका/महानगरपालिका यांचे तीन प्रतिनिधी (पैकी दोन महिला असाव्यात) नांवे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास कळविणेस सूचित केले आहे.

केंद्रपुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेसाठी स्थापीत करण्यात आलेल्या जिल्हा कृतीदलामध्ये जळगांव शहर महानगरपालिकेच्या खालील सदस्यांचा समावेश करणेस व त्यांची नांवे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास कळविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सौ. नेरकर सरिता अनंत
२. सौ. चव्हाण ज्योती बाळासाहेब
३. श्री. काळे अमित पांडुरंग

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **मराठे जितेंद्र भगवान** | |
| **अनुमोदक** | **:-** | **काळे रेश्मा कुंदन** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.१५)** १. घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ नुसार ५ वर्ष कालावधी करीता घंटागाडीव्दारे शहरातील दैनंदिन घरघरातुन निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. सर्व ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतुक करुन सुका कचरा उतरविणे व ओला कचरा रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतुक करणे.

२. शहरातील प्रभाग समिती क्र.१ ते ४ पैकी दोन प्रभागातील दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करीता ४०० कामगार पुरवठा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- शहरात दैनंदिन रस्ते,गटार,व्यापारी संकुल साफसफाई करणेसाठी मनपा कायम सेवेतील सफाई कर्मचारी प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये समान विभागणी करणेत यावेत तसेच पुरेश्या प्रमाणात कायम कर्मचाऱ्यांच्या अभावी मक्तेदाराकडून सफाई कर्मचारी पुरवठा करणेत येवुन ते देखिल प्रभाग समिती क्रं.१ ते ४ मध्ये समान विभागणी करणेत यावेत या कामी निविदा प्रक्रिया राबवुन प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

सौ.ज्योती चव्हाण :- प्रभाग समिती क्र.१ ते ४ पैकी दोन प्रभागातील असे न करता सर्व ४ ही प्रभाग समितीमध्ये समप्रमाणात कामगार वाटप करावे तसेच कायम कर्मचाऱ्यांकडूनही काम करुन घ्यावे. तसेच या डॉकेटमध्ये बदल झालेला आहे. याचे पुर्ण टेंडरमध्ये बदल झालेले आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- ४०० कामगार लावण्याचा हा प्रस्ताव आहे परंतु पुढील वर्षापर्यंत भुयारी गटारी होणार असल्यामुळे हे पाच वर्षासाठी करु नये. गरजेपुरते कामगार घ्यावेत.

श्री.भगत बालाणी :- ४०० कर्मचारी हे २ प्रभाग समितीमध्ये घेणार आहोत यामध्ये हे ४०० कर्मचारी व आपले ४०० कायम कर्मचारी हे ८०० कर्मचारी सर्व ४ प्रभाग समितीमध्ये समप्रमाणात वाटप करणेत यावे.

मा.आयुक्त :- ४०० कर्मचारी काम करतात. प्रत्येक वार्डात १० प्रमाणे आपण केले आहे. हे आपण पाच वर्षांचे दर निश्चित करुन घेत आहोत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव शहर म.न.पा. सार्वत्रिक निवडूक २०१३ चे वार्ड रचनेनुसार शहरातील एकूण ३७ वार्डांचे दैनंदिन साफ सफाई करणे कामी म.न.पा.आस्थापना सुचीवर ४०० कायम कामगारांचे रजेचे प्रमाणासह मनुष्यबळ व वाहन संख्या विचारात घेता मा.स्थायी समिती ठराव क्रं.४५४ दि.२७/०५/२०१६ अन्वये एकुण ३७ वार्डापैकी १२ वार्डांची साफ सफाई (रस्ते,गटार) म.न.पा.कडील आस्थापना सुचीवरील कायम कामगारांकडून करण्यात यावी व उव्ररित २५ वार्डातील दैनंदिन साफ सफाई व कचरा संकलन करुन वाहतूक करुन कचरा प्रकल्पा पर्यंत पोहच करणे कामी एकमुस्त दर पध्दतीने रु.३,१०,०००/- प्रतीमहा ई-निविदा प्रक्रिया करुन मक्तेदारामार्फत साफ सफाई करणेचे नियोजन करण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने २५ वार्डांच्या ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. तथापी ३ वार्डांची साफ सफाई करीता ई-निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्याने २२ वार्डांची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून मक्तेदारांना कार्यादेश देवून दैनंदिन साफ सफाई करण्यात येत होती. तथापी मध्यंतरीच्या कालावधीत २ वार्डातील दैनंदिन साफ सफाई बाबत नागरीकांच्या तक्रारी वाढल्याने २ वार्डांचे मक्ते रद्द करण्यात आले. त्यामुळे मुळ नियोजना व्यतिरिक्त १२ ऐवजी ५ वार्डातील अतिरिक्त अशी एकूण १७ वार्डातील दैनंदिन साफ सफाई म.न.पा. आस्थापना सुचीवरील ४०० कायम कामगारांकडून करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे आजच्या स्थितीत दैनंदिन साफ सफाई करणाऱ्या कामगारांवर ५ वार्डांची साफ सफाईचा बोजा पडल्याने विपरीत परिणाम झालेला आहे. तसेच वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार इ. संपुर्ण साफ सफाईची काम एकमुस्त पध्दतीने रक्कम रु.३,१०,०००/- प्रतीमहा ठोक वेतन प्रमाणे दिलेल्या मक्तेदारांमार्फत होणाऱ्या २० वार्डातील साफ सफाई कामकाजाबाबत पदाधिकारी व नागरीकांमध्ये नाराजीचा सुर दिसून येत आहे.

करीता प्रशासनाने २० वार्डातील एकमुस्त पध्दतीने (ठोक वेतन) साफ सफाईचे कामाचे दिलेले मक्ते रद्द करुन म.न.पा. सार्वत्रिक निवडणूक २०१८ चे १९ वार्ड (अ,ब,क,ड) रचनेनुसार घंटागाडी व्दारे संपुर्ण शहरातील दैनंदिन घराघरातून तसेच रस्त्यावरील निर्माण होणारा ओला व सुका कचरा विलगीकृत कचऱ्याचे संकलन करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे करीता ५ वर्ष कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही प्रस्तावीत केलेली आहे.

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मा.महासभा ठराव क्रं.७७३ दि.१६/१०/२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून त्यास शासनाची तांत्रिक मान्यता देखील प्रदान झालेली आहे. त्या अनुषंगाने अंमलबजावणी करणे करीता प्रशासनाने प्रस्तुत प्रकरणी सविस्तर नियोजन केलेले असून येणाऱ्या खर्चासह निविदा प्रपत्र मसूदा तयार केलेला असून त्यामध्ये शहरातील घराघराततून निर्माण होणारा कचरा, रस्त्यांवरील घनकचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ.ठिकाणांचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करुन सुका कचरा उतरविणे व कलेक्शन सेंटरपासून ओला कचरा रिफ्युज कॉम्पॅक्टर मध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा पर्यंत वाहतूक करुन कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी प्रस्तावीत निविदेत म.न.पा. तर्फे GeM पोर्टलवरुन वाहने खरेदी करुन (उदा.८५ घंटागाडया, ७ रिफ्युज कॉम्पॅक्टर, स्किप लोडर इ.म.न.पा.ची पुर्वश्रमीची वाहने) मक्तेदारास भाडे तत्वावर देण्याचे प्रशासनाने नियोजन असून प्रस्तुत प्रकरणी साफ सफाईचे कामी अंदाजीत प्रती वर्ष रु.९.३४ कोटी खर्च अपेक्षीत असून ५ वर्षाकरीता अदमासे रु.४६.७१ कोटी खर्च अपेक्षीत आहे. अंदाजीत खर्चाचे स्वतंत्र सविस्तर परिशिष्ट तयार केलेले असून यनिविदा पप्रत्राचा मसूदा अटी शर्तीसह प्रकरणी संलग्न आहे.

प्रस्तावीत दैनंदिन रस्ते, गटार साफ सफाई कामाचे नियोजना व्यतिरिक्त शहरातील उर्वरित म.न.पा.व्यापारी संकुले, उदयाने, दवाखाने, शाळा, मटन मार्केट, कोंडवाळा, स्मशानभुमी, कत्तलखाना इ. साफ सफाई कामी आस्थापना सुचीवरील कायम कामगारांचे मनुष्यबळ संख्याउ विचारात घेता शहरातील चार प्रभाग समितींपैकी दोन प्रभागातील दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई म.न.पा.आस्थापना सुचीवरील ४०० कायम कामगारांकडून करुन घेणे योग्य होईल व उर्वरित दोन प्रभागातील दैनंदिन रस्ते, गटार साफ सफाई इ. कामी मक्तेदारामार्फत अतिरिक्त ४०० कामगार पुरवठा करण्याचे देखील नियोजन केलेले असुन अंदाजीत प्रती वर्ष रु.५.७६ कोटी खर्च अपेक्षीत ५ वर्षाकरीता अदमासे रु.२८.८० कोटी खर्च अपेक्षीत आहे. (परिशिष्ट संलग्न असे.)

तरी ई-निविदा प्रक्रिया करणेपुर्वी सदरचा प्रस्ताव प्रशासनाने नियुक्त केलेली ई-निविदा समिती समोर सखोल चर्चा होवून पडताळणी अंती म.न.पा. विधी सल्लागार यांचे मार्फत अटी शर्ती तपासून निविदा प्रक्रिया राबविणे योग्य होईल. सदर निविदा प्रक्रियेकामी प्रती वर्ष अंदाजीत रक्कम रु.१५.१० कोटी खर्च अपेक्षीत असून ५ वर्षाकरीता अंदाजीत रक्कम रु.७५.५० कोटी येणारा खर्च हा १४ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून अनुज्ञेय असून सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १६० नुसार मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने शहरात दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुल साफसफाई करणेसाठी मनपा कायम सेवेतील सफाई कर्मचारी प्रभाग समिती क्रं. १ ते ४ मध्ये समान विभागणी करणेत यावेत तसेच पुरेश्या प्रमाणात कायम कर्मचाऱ्यांच्या अभावी मक्तेदाराकडून सफाई कर्मचारी पुरवठा करणेत येवुन ते देखिल प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये समान विभागणी करणेत यावेत. तसेच या कामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेपुर्वी सदरचा प्रस्ताव निविदा समितीपुढे ठेवुन पडताळणी अंती व विधी सल्लागार यांचेकडून तपासणी करुन निविदा प्रक्रिया करणेत यावी.

सदर कामाची एक मुस्त निविदा न काढता मनपा प्रभाग समिती १ ते ४ प्रमाणे प्रत्येक प्रभाग समितीच्या कामाची ई-निविदा स्वतंत्रपणे काढावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **मराठे जितेंद्र भगवान** | |
| **अनुमोदक** | **:-** | **काळे रेश्मा कुंदन** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.१६)** जळगांव शहर महानगरपालिका होणाऱ्या विकास कामाचे अंमलबजावणी कामी प्रकल्प सल्लागार पॅनलवर आर्किटेक्ट / इंजिनियर यांची नेमणुकीबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले यादी प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.भारती सोनवणे :-** मनपाच्या मालमत्ता, खुल्या जागांचे नियोजन करणे कामी सन्मा.सदस्य श्री.भगत बालाणी यांचेकडील प्रकल्प सल्लागार पॅनलवर आर्किटेक्ट/इंजिनिअर नेमणुकीचा प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, महानगरपालिकेकडुन करण्यात येणाऱ्या नागरी कामांसाठी संकल्पने तयार करणे अंदाजपत्रक तयार करणे, शासकीय स्तरावर तांत्रिक, वित्तीय मान्यता घेणे, कामांचे नियोजन करणे, काम करतांना देखरेख ठेवणे, तांत्रिक सल्ला देणे, वेळेवर कामे पुर्ण होण्यासाठी कार्यवाही करणे या साठी सल्लागार यांचे पॅनेल तयार करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेची कामे वेळेवर पुर्ण करणे, विविध निधीतुन होणारी कामे नियोजनबध्द पध्दतीने करुन सर्व सामान्य नागरीकांना तात्काळ फलदायी ठरणे या अनुषंगाने कार्यवाही अपेक्षित असते. मात्र अपुऱ्या मनुष्यबळा मुळे प्राकलन वेळेवर तयार करणे, कामासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या मान्यता घेणे, कामावर पर्यवेक्षण ठेवणे, व्यवस्थापन करणे ही कामे वेळेवर होत नाहीत.

शहरातील १) जिल्हा परिषद चौक ते नेल्सन मंडेला चौकापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, २) शास्त्री टॉवर चौक ते स्वातंत्र चौक ते महाबळ पर्यंतचा रस्ता कॉक्रीटकरण करणे,३) स्वातंत्र चौक ते नेरी नाका चौकापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ४) पिंप्राळा रेल्वे गेट ते सिंधी कॉलनी पर्यंत रस्त्याचे (रिंगरोड) कॉक्रीटीकरण करणे, ५) पिंप्राळा रेल्वेगेट ते सोमाणी ते सोमाणी मार्केट पर्यंतचा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे व इतर रस्ते विकसित करणे, पावसाच्या पाण्याच्या निचरा करणेसाठी खुल्या पर्जन्यवाहीन्या विकसित करणे, विविध प्रकारच्या इमारतीचे संकल्पन, नकाशे, आराखडे तयार करणे, बाजार संकुले बांधकाम, क्रिडा संकुले बांधकाम, बगिचे तयार करणे, इमारतीतील अंतर्गत सजावटीची कामे करणे, ईलेक्ट्रीकल कामे, पाणी पुरवठा प्रकल्प, मल:निस्सारण प्रकल्प, बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावरील कामे, नागरी-खाजगी सहभाग तत्वावरील कामे या साठी वास्तुविशारद सेवा, तांत्रिक सल्लागार सेवा, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा ई. खाजगी सल्लागारांकडुन घेतल्यास त्यामुळे वेळेची मोठया प्रमाणावर बचत होवुन कामे वेळेवर पुर्ण होतात. तसेच खाजगी सेवा घेतल्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन व्यापक स्वरुपात कामांचे नियोजन सहज शक्य होते.

तरी महानगरपालिकेडुन होणाऱ्या कामांचे संकल्पन, नकाशे, आराखडे, आर.सी.सी. संकल्पन, नियोजन, व्यवस्थापन करणेसाठी वास्तुविशारद, खाजगी तांत्रिक सल्लागार सेवा, इमारत बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांच्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, खाजगी सहभाग तत्वारील प्रकल्प / बांधा वापरा हस्तांतर करा तत्वावरील प्रकल्पासाठी सल्लागार सेवा, सर्व प्रकारची ईलेक्ट्रीकल कामे करण्यासाठी सल्लागार सेवा ई. सर्व प्रकारच्या खाजगी सल्लागार सेवा नकाशे, आराखडे, अंदाजपत्रके, आर.सी.सी.संकल्पन तयार करुन, आवश्यक सर्व प्रकारच्या शासन मान्यता घेण्यासाठी पाठपुरावा करणे, कामाचे व्यवस्थापन करणे, काम सुरु असतांना तांत्रिक पर्यवेक्षण ठेवणे, सल्ला देणे, काम वेळेवर पुर्ण करण्यासाठी अचुक नियोजन करुन कामे वेळेवर पुर्ण करणे यासाठी उपरोक्त सल्लागारांचे ३ वर्षे कालावधीसाठी पॅनेल तयार करण्यासाठी निविदा मागवुन दर निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार अनुषंगिक अटीशर्ती तयार करुन निविदा मागविण्याची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:-** | **६९** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:-** | **सोनवणे भारती कैलास** | |
| **अनुमोदक** | **:-** | **पोकळे दिलीप बबनराव** | |

**नगरसचिव :- विषय क्रं.१७)** विद्यमान विधी समिती बरखास्त करणे, जिल्हा न्यायालय, उच्चन्यायालय, सर्वोच्चन्यायालय तसेच इतर ठिकाणचे विधीतज्ञ / विधी सल्लागार त्यांचे तात्काळ झालेल्या नेमणुक रद्द करणे व नविन पॅनल निर्माण करणे कामी सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.ललित कोल्हे :- सन्मा.सदस्य श्री.भगत बालाणी यांचे कडील विधी समिती बरखास्ती, विधी सल्लागार नेमणुक रद्द तसेच नविन पॅनल निर्माण करणेचा प्रस्ताव मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, विद्यमान विधी समिती बरखास्त करणे, जिल्हा न्यायालय, उच्चन्यायालय, सर्वोच्चन्यायालय तसेच इतर ठिकाणचे विधीतज्ञ / विधी सल्लागार त्यांचे झालेल्या नेमणुक तात्काळ रद्द करणे व नविन पॅनल निर्माण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर नविन नेमणुकी कामी आवश्यक ती प्रक्रिया करुन स्थायी समितीच्या मान्यतेने तात्काळ नेमणुका करणेत यावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्रं.१८)** स्मशानभुमीत मोफत लाकडे पुरविणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.दिलीप पोकळे :- जळगांव मनपा तर्फे यापुर्वी देखिल स्मशान भुमित मोफत लाकडे पुरविण्यात येत होती., मात्र शासनाच्या लेखा परिक्षणाच्या आक्षेपा नुसार सदर सेवा बंदावस्थेत आहे, शहरात बऱ्याचश्या प्रमाणात दारिद्रय रेषे खालील नागरीक असुन ते अत्यंविधीसाठी लाकडे खरेदी करु शकत नाही त्यांचेसह इतरांना देखिल सदर सेवा मनपातर्फे पुनश्च: कार्यान्वीत करणे बाबत महाराष्ट्र शासनाचे अर्थ विभाग, सामान्य प्रशासन विभाग व ऑडीटर जनरल, मुंबई (ए.जी.) यांचे कडून अभिप्राय मागवुन पुढील कार्यवाही करणे बाबत सन्मा.सदस्य श्री.भगत बालाणी यांचे कडील प्रस्ताव मान्य तसेच प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीस तपासुन कार्यवाही करावी.

श्री.नितीन लढ्ढा :- ठराव क्रं.५६० दि.३/१२/२०१६ चे वाचन केले. या ठरावाचा यपाठपुरावा करणेत यावा. यापुर्वी आपण ठराव केलेला असल्याने शासनाची त्यास मान्यता घ्यावी नव्याने घेण्याची आवश्यकता नाही.

श्री.दिलीप पोकळे :- दारिद्र रेषेखालील व इतर लोकांसाठी असे नमूद करुन प्रस्ताव पाठवावा.

श्री.नितीन लढ्ढा :- इतर लोकांनाही याचा लाभ मिळेल कां ?

श्री.भगत बालाणी :- शासनाने नविन प्रस्ताव देण्यास सांगीतले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव मनपा तर्फे यापुर्वी देखिल स्मशान भुमित मोफत लाकडे पुरविण्यात येत होती. मात्र शासनाच्या लेखा परिक्षणाच्या आक्षेपा नुसार सदर सेवा बंदावस्थेत आहे, शहरात बऱ्याचश्या प्रमाणात दारिद्रय रेषे खालील नागरीक असुन ते अत्यंविधीसाठी लाकडे खरेदी करु शकत नाही त्यांचेसह इतरांना देखिल सदर सेवा मनपातर्फे पुनश्च: कार्यान्वीत करणे बाबत महाराष्ट्र शासनाचे अर्थ विभाग, सामान्य प्रशासन विभाग व ऑडीटर जनरल, मुंबई (ए.जी.) यांचे कडून अभिप्राय मागवुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींतची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव :- विषय क्रं.१९)** आमदार व खासदार अथवा इतर निधीतुन पुरविण्यात आलेल्या दिवाबत्ती संबंधीत केलेला ठराव रद्द करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.भगत बालाणी :- आमदार व खासदर निधीतून दिवाबत्ती बाब वरील खर्च करणेचा ठराव यापुर्वी शासनाकडेस विखंडनास पाठविण्यात आलेला आहे त्यामुळे यापुर्वी आमदार व खासदार निधीतून दिवाबत्ती खर्चा बाबत केलेला ठराव रद्द करणेचा प्रस्ताव मान्य. आमदार व खासदार यांचे निधीतून लाईटचे प्रस्ताव दिलेले होते त्यांना मंजूर देण्यात यावी.

श्री.नितीन लढ्ढा :- कालांतराने हे दिवे बंद पडतात त्यामुळे ते दुरुस्तीचीही जबाबदार घ्यावी.

मा.आयुक्त :- मिनी हायमास्ट उभारु नये असा ठराव झालेला आहे व आता हा मा.आमदार व मा.खासदार यांचे निधीतून लाईटचे प्रस्ताव मांडलेला आहे. तरी याबाबत चौकशी करणेत येईल. ज्याठिकाणी सुटेबल असेल तेथे बसविणेत येईल.

श्री.ईब्राहीम पटेल :- जे अस्तित्वात आहेत त्यांची देखभाल कोण करणार ?

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, आमदार व खासदार निधीतुन दिवाबत्ती बाब वरील खर्च करणेचा ठराव यापुर्वी शासनाकडेस विखंडनास पाठविण्यात आलेला आहे, त्यामुळे यापुर्वी आमदार व खासदार निधीतून दिवाबत्ती खर्चा बाबत केलेला ठराव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- सोनवणे भारती कैलास**

**नगरसचिव :- विषय क्रं.२०)** दि.१९/१२/२०१३ ठराव क्र.४० सभागृहाचे मान्यतेने पारित झालेला सदर ठरावा प्रमाणे गाळे धारकांना बाजार मुल्या प्रमाणे किंमत ठरविण्यात येऊन त्यावर ५ पट दंड आकारणी करण्याचा निर्णय झालेला आहे. सदर ठरावा मध्ये मुल्यांकन व त्यावर ८% भाडे व दंड हे अन्यायकारक व बेकायदेशीर असल्याबाबत विद्यमान गाळे धारकांचे

म्हणणे आहे तरी नियमानुसार व वाजवी आकारणी करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.भगत बालाणी :- मनपा व्यापारी संकुलातील गाळेधारकांना बाजार मुल्याप्रमाणे किंमत ठरविण्यात येवुन त्यावर ५ पट दंड आकारणी करण्याचा निर्णय झालेला असुन सदर ठरावामध्ये मुल्यांकन व त्यावर ८ टक्के करणे हे अन्यायकारक असल्याबाबत गाळेधारक यांच्या विनंती अनुसरुन सदर कामी म.आयुक्त, म.सहाय्यक संचालक नगरचना, कर मुल्यांकन/निर्धारण करणारे अधिकारी यांची समिती गठीत करणेचा प्रस्ताव मान्य. गेल्या अनेक वर्षापासून गाळेधारक यांचा प्रश्न प्रलंबीत आहे. शासन निर्णय व कोर्टाचे निर्णय तसेच गाळेधारकांशी विचार विनिमय करुन यासाठी तीन सदस्यीय समिती गठीत करणेत यावी. यामध्ये म.आयुक्त, म.सहाय्यक संचालक नगरचना, कर मुल्यांकन/निर्धारण करणारे अधिकारी यांची समिती गठीत करणेत यावी.

श्री.सुनिल महाजन :- ही समिती कायदेशिर असेल कां ?

मा.आयुक्त :- मा.उच्च न्यायालय व शासन निर्णयामध्ये याबाबत काहीही नमूद नाही दुसरे महासभा सार्वभौम आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- हायकोर्ट व शासन यांचा या समितीमुळे अवमान होईल कां ? तसेच या समितीमुळे वेळेचा अपव्यय झालातर या समितीस जबाबदार धरणेत यावे.

श्री.भगत बालाणी :- समिती शासनाकडे अहवाल देईल.

श्री.नितीन लढ्ढा :- १४ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र शासनाने मा.आयुक्त यांना दिलेले पत्र (महासभा ठराव क्रं.४०) वाचन केले. हे १४ सप्टेंबर चे पत्र आहे या पत्राचे अनुषंगाने म.आयुक्त साहेब यांनी पत्र दिले आहे (पत्र वाचन केले) तरी तुम्हाला जो निर्णय घ्यायचा असेल तो घ्या.

*** भा.ज.पा. व शिवसेना सदस्य एकाचवेळी बोलत राहील्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२३ पारित करण्यात आला.**

याबाबत श्री.भगतराम रावलमल बालाणी यांनी चर्चेदरम्यान लेखी सुचना दिली ती पुढील प्रमाणे असा ठराव करण्यात आहे की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे व्यापारी गाळे दिर्घ मुदतीने दिलेले आहेत व त्यांचे पैकी बहुतांशी गाळेधारकांची भाडेपट्टयाची मुदत संपलेली आहे. महासभा विषय क्र.०६ ठराव क्र.४० दि.१९/१२/२०१३ अन्वये मुदत संपलेल्या विद्यमान गाळे धारकांकडे रेडीरेकनरनुसार येणाऱ्या किमतीवर भाडे व त्यासह भाडयाचे ५ पट दंड येणे प्रमाणे ठराव पारीत करण्यात येऊन अंमलबजावणी करणेत येत आहे व सन २०१२ पासुन आजपावेतो आकारणी करणेत येत आहे. सदर बाब अन्यायकारक अवास्तव व बेकायदेशीर असलेबाबत गाळेधारकांची असोसिएशनने दि.११/०९/२०१८ रोजी मा. आयुक्त यांना पत्र दिले आहे. तसेच आमदार मा.श्री.चंदुभाई पटेल व आमदार मा.श्री.सुरेश भोळे यांनी सुध्दा सदर बाबतीत म.आयुक्तांना पत्र देऊन असोसिएशनची मागणीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येत आहे व ह्यापुर्वी झालेली आकारणीची प्रक्रिया धक्कादायक असुन प्रकरणी लक्ष घालुन त्यामध्ये चुक आढळुन आल्यास दुरुस्तीची कार्यवाही करणेस विनंती केली आहे.

सबब या प्रकरणी वरील झालेल्या ठराव क्र.४० कायद्याचे तरतुदी विरुध्द आहे किंवा कसे ह्याची पडताळणी केली असता "मुदत संपल्यानंतरही गाळेधारकांने गाळा मनपाचे ताब्यात न देता स्वत:च्या ताब्यात ठेवला असेल अशा गाळयासाठी मुळ गाळाधारक यांचा करार संपल्यापासुन ते पुढील लिलाव प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी गाळा भाडे त्या वर्षाच्या रेडीरेकनर नुसार म.नगररचनाकार यांनी निश्चित केलेल्या गाळाभाडेच्या ५ पट या दराने मुळ गाळा धारकास भरणे बांधनकारक राहील, असा ठराव करण्यात आला." व झालेल्या ठरावाप्रमाणे बाजार मुल्याचे ८% या प्रमाणे वार्षिक भाडे व त्यावर ५ पट दंड आकारणी केलेने म्हणजेच ४०% वार्षिक (८ X५=४० ) म्हणजे गाळा जागेच्या बाजार मुल्याचे ४०% एवढी किंमत आकारणी करण्यात आलेली आहे.

भाडे ठरवतांना रेडीरेकनर च्या संपुर्ण तरतुदी न वापरता जसे मुख्य रस्ता सन्मुख गाळा, आतील गाळा, पहिल्या मजल्यावरील गाळा, लॉफ्ट चे क्षेत्र व इमारतीचे घसारा इत्यादींचा कोणत्याही वजावटीची तरतुद विचारात न घेता सरसकट मुल्यांकन करण्यात येऊन त्यावर ८% प्रमाणे भाडे ठरवण्यात आलेले आहे. त्यामुळे बहुतांशी गाळाधारकांवर अन्याय झाला आहे. तसेच देय असलेल्या भाडयावर ५ पट दंड आकारण्याची तरतुद कोणत्याही कायद्यात नाही. तरी त्याप्रमाणे आकरणी करणेत आली आहे जी जाचक व कोणत्याही तरतुदींप्रमाणे नाही.

सदर बाब महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाचे क्र.जमनपा२०१७/प्र.क्र.२५०/नवि-२५ दि.१८ डिसेंबर २०१७ अन्वयेच्या निर्देशात महापालिकेस ठराव क्र.४० चे बाबत शासन स्तरावर झालेल्या निर्णय मधील कॉलम (ब) प्रमाणे : गाळयांचे प्रलंबीत भाडयाबाबत : " जळगांव महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील ज्या मार्केट मधील गाळयांची मुदतवाढ संपली आहे अशा गाळयांचे थकीत भाडे त्या त्या वर्षाचे (रेडीरेकनर) शिघ्रसिध्द गणकाचे दर विचारात घेऊन महानगरपालिकने निश्चित करावे; सदर रक्कम वसुल करतांना थकीत रकमेवर अधिनियमातील तरतुदीनुसार २% व्याज आकारण्यात यावे." असे कळविण्यात आले आहे म्हणजेच ५ पट दंड आकारणी बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे.

**सबब ह्यामध्ये दुरुस्ती करणेकामी**

महानगरपालिकेच्या मुदत संपलेल्या मार्केटची व त्यामधील गाळयांची संख्या, झालेली आकारणी बरोबर आहे किंवा कसे ह्याचे मुल्यांकन तपासणी. झालेली आकारणी दोष पुर्ण असल्यास ती रेडीरेकनरचे तरतुदीनुसार दुरुस्ती करणे. मुल्यांकनावर ८% बाबत आकारणी इत्यादी प्रमाणेची सबब पुढील प्रमाणे बाबी तपासणी आवश्यक आहे.

१. भाडे ठरविण्यासाठी धरण्यात आलेले मुल्यांकन रेडीरेकनरचे सर्व तरतुदीनुसार गाळयांचे मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे ?
२. मुल्यांकनाचे ८% प्रमाणे वार्षिक भाडे ठरविणे ही शासकीय तरतुद बरोबर आहे किंवा कसे ?
३. ठरविणेत आलेले भाडे ह्यावरील ठराव क्र.४० नुसार दंड ह्यास कायदेशीर आधार आहे किंवा कसे ?
४. शासनाचे दि.१८/१२/२०१७ चे निर्णयाप्रमाणे भाडयाचे थकीत रकमेवर अधिनियमातील तरतुदीनुसार २% व्याज आकरण्यात यावे असे नमुद आहे. हे बरोबर आहे किंवा कसे ?
५. मुदत संपलेल्या गाळेधारकांनी गाळा ताब्यात ठेवल्यामुळे त्याचे मुल्यांकनानुसार भाडे ठरविणे, त्यावर व्याज ठरविणे तसेच ठराव क्र.४० मध्ये नमुद ५ पट दंड कमी करणे ह्या विषयी मे. न्यायालय अथवा शासनाचे कोणत्याही आदेश अथवा तरतुदीमुळे सभागृहास निर्णय घेणेस बाधा अथवा अडचण आहे किंवा कसे ?

वरील नमुद १ ते ५ बाबींच्या कामाचा अवाका बघता अभ्यास करुन झालेल्या चुकांची दुरुस्ती अंती परिपुर्ण प्रस्ताव तयार करण्यात येऊन सभागृहास अवगत करणेकामी व निर्णय घेणे कामी अधिकारी व सभागृह सदस्यांची समिती नेमणे आवश्यक आहे. सबब सभागृहाने १) मा.आयुक्त २) मे.स.स. नगररचना किंवा नगररचनाकार ३) श्री.भगतराम बालाणी ४) अड.सौ.शुचिता हाडा ५) श्री.राजेंद्र घुगे पाटील ह्यांची समिती गठीत करणेत यावी व समितीने लवकरात लवकर अभिप्रायासह अहवाल निर्णय घेणे कामी सभागृहास सादर करणेस व येणे प्रमाणे सुचना होणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- १२**
**सूचक :- कोल्हे ललित विजयराव**
**अनुमोदक :- काळे रेशमा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्रं.२१)** जळगांव शहराच्या मलनिस्सारण योजने अंतर्गत प्रक्रिया केंद्राच्या तंत्रज्ञानबाबत एमएमबीआर तंत्रज्ञान ऐवजी एसबीआर तंत्रज्ञानाचा वापर करणेबाबत विचार व्हाव व त्यादृष्टीने अंदाजपत्रकात योग्यती सुधारणा करुन योजनेची अंमलबजावणी करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांचे आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

सौ.भारती सोनवणे :- सन्मा.सदस्य श्री.भगत बालाणी यांचें कडील मलनिस्सारण योजने अंतर्गत एमएमबीआर तंत्रज्ञान ऐवजी एसबीआर तंत्रज्ञानाचा वापरणे तसेच या तंत्रज्ञाचा व्यतिरिक्त अदयावत तंत्रज्ञान उपलब्ध असल्यास त्याचा वापर करणेचा प्रस्ताव मान्य.

श्री.नितीन लढ्ढा :- फक्त टेक्नालॉजी बदलून घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगांव शहराच्या मलनिस्सारण योजने अंतर्गत प्रक्रिया केंद्राच्या तंत्रज्ञानबाबत एमएमबीआर तंत्रज्ञान एवजी एसबीआर तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच या तंत्रज्ञाना व्यतिरिक्त अदयावत तंत्रज्ञान उपलब्ध असल्यास त्याचा विचार होणे व त्यादृष्टीने अंदाजपत्रकात योग्यती सुधारणा करुन योजनेची अंमलबजावणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे भारती कैलास**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं.१)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जु.ह.) मध्ये मौजे जळगांव शिवार स.नं.३३७/३ब/१, ३३७/३ब/२, ३३७/३ब/३, ३३७/३ब/४ या जमिनीवर आरक्षण क्र.०५ ‘ प्राथमिक शाळा ’ व ‘ क्रिडांगण ’ करीता भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये संपादीत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.भगत बालाणी :- मा.महापौर महोदय, मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता हा विषय आताच घेणे योग्य होणार नाही तसेच सर्व सदस्यांना या विषयाची पुर्ण माहिती होणे जरुरीचे आहे.

मा.आयुक्त :- महासभेची मान्यता दयावयाची आहे तसेच हे हायकोर्टाचे कॅलक्युलेशन आहे. ५०% रक्कम त्यांनी आगाऊ मागीतली आहे. आपण त्यांना आता पैसे दिले नाहीत तर ते कोर्टात सांगतील की मनपा आपल्या आदेशाचा अवमान करते त्यामुळे हे तात्काळ करणे गरजेचे आहे.

श्री.भगत बालाणी :- आता १२ कोटी देऊ नंतर परत १२ कोटी देऊ परंतू सदस्यांना याचा पुर्ण अभ्यास नाही तरी याचा अभ्यास व्हावा.

मा.आयुक्त :- भुसंपादन प्रस्तावाला मान्यता देणे आवश्यक आहे.

श्री.नितीन लड्ढा :- परंतू आपल्याकडे त्याकामी निधी शिल्लक आहे कां ?

मा.आयुक्त :- भुसंपादनासाठी १५ कोटी रुपये शिल्लक आहेत.

श्री.नितीन लड्ढा :- मागील बॉडीत सुध्दा असे विषय आलेले होते. ज्या ठिकाणी ॲप्रोज नाही तेथे परवानगी दिली नाही. भुसंपादनामुळे वारंवार भुर्दंड पडतो.

मा.आयुक्त :- अजुनपर्यंत निवाडा झालेला नाही. ५०% रक्कम त्यांनी मागणी केली त्यापैकी आपण ७०% रक्कम देऊ शकतो. मनपाने भुसंपादनास परवानगी दिली नाही तर कोर्टाचा अवमान होईल व त्याचा परिणाम सदस्यांवरही होऊ शकतो.

श्री.नितीन लड्ढा :- असाच शिक्षकांचा सुध्दा विषय कोर्टात आहे तसेच भुसंपादनाचे अनंत विषय याचप्रकारचे आहेत ते प्रलंबीत आहेत.

मा.आयुक्त :- पुढील सभेत भुसंपादनाचे प्रकरणांची माहिती व आकडेवारी सादर केली जाईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, सदरचा प्रस्ताव सन्मा.सदस्यांना परिपुर्ण अभ्यास करण्यासाठी पुढील महासभेत सादर करावा. तरी सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे भारती कैलास**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं.२)** शहर वाहतुक शाखा जळगांव पोलीस प्रशासनाकडील मागणीनुसार टोईंग व्हॅन (क्रेन) -२ नग मनपा फंडातुन खरेदी करणे कामी प्रशासनाकडुन आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, मा.पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा यांचेकडील पत्र जा.क्र.१०३०/२०१७ दि.१८/०९/२०१७ जळगांव शहर हे जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठ असुन शहरात मोठया प्रमाणात व्यापारी व बाजार संकुल असुन सदर ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या वाहनाचे पार्कींग करिता पुरेशी व्यवस्था नसल्याने येणारे नागरिक हे त्यांचे वाहन रस्त्यावर उभे करुन निघुन जागात. सदर वाहने रस्त्यावर पार्क केल्यामुळे सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वेळोवेळी वाहतुक कोंडी होत असते. तसेच जळगांव शहर महानगरपालिकेच्या वतीने जळगांव शहरात विविध ठिकाणी नो-पार्कींग झोन, वन वे रस्ते, सम-विषम पार्कींग, पार्कींग पट्टे आखण्यात आलेल असुन सदर ठिकाणी वाहतुक नियमाची अंमलबजावणी करणे करिता पर्यायी साधन नसल्याने बेशिस्त वाहन चालकावर प्रभाविपणे कारवाई होत नाही. तसेच रस्त्यावर होणाऱ्या बेशिस्त पार्कींगमध्ये वेळोवेळी रस्त्यावर होणाऱ्या वाहतुक कोंडीमुळे अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो. सदर वाहने बेशिस्तपणे पार्क करणाऱ्या वाहन धारकांवर कार्यवाही करतांना वाहतुक पोलीस कर्मचाऱ्यासोबत टोईंग व्हेहिकल असल्यास सर्व बेशिस्त वाहन धारकांवर प्रभावीपणे कारवाई करता येईल व वाहतुकीस शिस्त लागण्यास मोठया प्रमाणावर मदत होईल. तरी जळगांव शहरातील वाहतुकीच्या नियोजनाकरिता व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच शहरातील वाहतुकीस शिस्त लागुन वाहतुकीचे नियम नाकरिता टोईंग क्रेन व्हॅन तात्काळ वाहतुक शहर शाखा जळगांव करिता उपलब्ध करुन देणे बाबत मा.पोली निरिक्षक, शहर वाहतुक शाखा जळगांव यांनी विनंती केलेली आहे.

मा.पोलीस निरिक्षक, शहर वाहतुक शाखा जळगांव यांनी केलेल्या मागणीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत २ नग टोईंग व्हेहिकल (क्रेन) मनपा फंडातुन खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे भारती कैलास**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं.३)** प्रशासकीय कामकाजाकरिता मनपा फंडातुन मारुती सियाझ-१ नग खरेदी करणे कामी प्रशासनाकडुन आलेले प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.भगत बालाणी :- मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी मनपाची वाहने न वापरण्याचा निर्णय घेतला आहे परंतू अधिकारी यांना वाहन देणेस हरकत नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, वित्त विभाग शासन निर्णय डी.एस.पी.१०८०/सी.आर.५६४/जी.ई.एन-५ दि.१९/०५/१९८४, शासन निर्णय क्र.विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/विनिमय मंत्रालय मुंबई दि.०१/०५/१९९१ अन्वये (१) निरनिराळया वाहनांचे आयुष्य खालील अटीवरुन ठरविण्यात यावे.

धावल्याचे अंतर (किलोमिटर्समध्ये ) आणि वाहन वापरण्याचा कालावधी (वर्षामध्ये) यापैकी जे नंतर पुर्ण होईल शासन निकषानुसार वित्तीय व प्रशासकीय अधिकार वाहन निरुपयोगी ठरविण्याबाबत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

| | **किलोमिटर्स** | **वर्ष** |
|---|---|---|
| १. लॉरी व इतर अवजड मोटार वाहने | २००००० | १० |
| २. मोटार वाहने व जीप | २४०००० | १० |
| ३. मोटार सायकली | ३००००० | १० |

शासन निर्णयानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची ६३ वाहने निर्लेखित करण्यास मा.महासभा ठराव क्र.१९९८, दि.१६/०८/२०११, मा.महासभा ठराव क्र.१८२, दि.२९/०१/२०१५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच मा.स्थायी समितीने तक्त्यात नमुद केलेल्या ठरावानुसार सदर वाहने निर्लेखित करुन लिलाव करण्यास सक्षम मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मा.स्थायी समिती ठराव | कालबाह्य /निर्लेखित/लिलावसाठी मान्यता दिलेली एकुण वाहने | निर्लेखित / कालबाह्य झालेली प्रशासकीय वाहने |
|---|---|---|---|
| १ | ठ.क्र.९७ दि.१९/०७/२०१४ | १२ वाहने | ०५ |
| २ | ठ.क्र२४९ दि.२३/०४/२०१५ | १३ वाहने | ०६ |
| ३ | ठ.क्र.२७८ दि.१९/०६/२०१५ | ०४ वाहने | ०१ |
| ४ | ठ.क्र.२७९ दि.१९/०६/२०१५ | ०२ वाहने | ०१ |
| ५ | ठ.क्र.३०२ दि.१४/०८/२०१५ | ३२ वाहने | ०८ |
| | **एकुण :-** | **६३ वाहने** | **२१ वाहने** |

महानगरपालिका प्रशासकीय कामकाजाकरिता यापुर्वी ३५ वाहने प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत होती. शासन निर्णय, मा.महासभा व मा.स्थायी समितीच्या मान्यतेने ३५ वाहनांपैकी विविध प्रकारचे २१ वाहने मनपा कामकाजातुन कायम स्वरुपी बंद करण्यात आलेली असुन प्रशासन गतीमान करण्याकामी प्रशासकीय वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. आज रोजी प्रशासकीय कामकाजाकरिता फक्त १४ वाहने कार्यान्वित आहेत.

मा.आयुक्त सो., यांना महानगरपालिका प्रशासकीय कामकाजाकरिता वेळोवेळी बाहेरगांवी (मुंबई, नाशिक, औरंगाबाद) येथे जावे लागते तसेच जळगांव शहराचा पाहणी दौरा करावा लागतो. मा.आयुक्त सो., यांचे कार्यालयाकडे कार्यान्वित असलेले वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता दुसऱ्या विभागात कार्यान्वित ठेवता येईल. स्विय सहाय्यक मा.आयुक्त कार्यालय यांचेकडील रिपोर्ट प्रमाणे नविन वाहन मनपा फंडातुन खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे भारती कैलास**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

नगरसचिव :- मा.सभागृहनेता श्री.ललित विजय कोल्हे, मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन, मा.गटनेता,भा.ज.पा. श्री.भगत रावलमल बालाणी, मा.गटनेता,शिवसेना, श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी तसेच मा.गटनेता,एम.आय.एम. श्री. बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर यांचे हस्ते सत्कार करणेत येत असून सर्वांनी व्यासपिठावर यावे. (सर्वांचा सत्कार करणेत आला) तसेच नवनियुक्त स्थायी समिती सदस्य व महिला बालकल्याण समिती सदस्यांचे सुध्दा मा.महापौर व उपमहापौर हे सत्कार करीत असून सर्व नवनियुक्त समिती सदस्यांनी व्यासपिठावर यावे. (सर्व सदस्यांचा मा.महापौर व उपमहापौर यांचे हस्ते सत्कार करणेत आला.)

सामुहीक राष्ट्रगीत गायनानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका जळगांव**